


ISBN 81-87012-22-6

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ अनुदानित
पुस्तकाची द्वितीयावृत्ती

# किलबिलाट

डॉ. पवन मांडवकर

Published by Government Recognized National Level Publisher

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून
या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीला अनुदान मिळाले होते.

छोट्या दोस्तांसाठी खास बडबडगीते आणि बालकवितांचा संग्रह.
नर्सरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांवर संस्कारक्षम मूल्ये
रुजविण्यासाठी शाळांकरिता उपयुक्त.

# किलबिलाट

## डॉ. पवन मांडवकर

महासरस्वती पब्लिकेशन
सौ. विद्या किरण रावण
शाहूपुरी, ५ वी गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१
मोबा. नं.: ९६७३७३८१८१

ISBN 978-81-870122-2-6

या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजनेअंतर्गत अनुदान मिळाले होते. पुस्तकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि राज्य शासन लेखकाच्या मतांशी सहमत असेलच असे नाही.

- किलबिलाट
  (Kilbilat)


- ©डॉ. पवन मांडवकर
  (Dr. Pavan Mandavkar
  Department of Marathi, Indira Mahavidyalaya, Kalamb)


- साहित्यप्रकार – बालकाव्य


- लेखक – संपर्क : ९४२२८६७६५८



- प्रकाशन क्र. १९६

- प्रकाशन दि. ३ नोव्हेंबर २०२२

- प्रकाशक
  महासरस्वती पब्लिकेशन
  सौ. विद्या किरण रावण
  शाहूपुरी, ५ वी गल्ली
  कोल्हापूर ४१६ ००१
  मोबा. नं.: ९६७३७३८१८१८

मूल्य १३० रुपये

# अनुक्रमणिका


छोट्या दोस्तांनो / ५
द्वितीयावृत्तीच्या निमित्ताने / ६
पूर्वप्रसिद्धी / ६
१. प्रार्थना / ७
२. वंदन / ८
३. साप्ताहिकी / ९
४. गाव आपुले सुखी करू / १०–११
५. स्वप्न माझे / १२–१३
६. आईची दिनचर्या / १४–१५
७. असं मी ठरवलं / १६
८. भारत दर्शन / १७
९. जत्रा / १८
१०. कसे वागावे? / १९
११. भाजीवाला / २०
१२. जादूगार / २१
१३. चष्मा / २२
१४. आमची व्हिकी / २३
१५. रेडिओ / २४
१६. आमच्या गाड्या / २५
१७. बाहुली / २६
१८. धम्मक लाडू / २७
१९. माझा स्वयंपाक / २८
२०. भोजन भाऊ / २९
२१. भाज्यांचे भांडण / ३०
२२. चौकस चिंगी / ३१
२३. शाहणा चिंटू / ३२
२४. शूर ठमी / ३३
२५. बालवाडी / ३४

२६. निलूची परीक्षा / ३५
२७. चंदू / ३६
२८. आजीचे दात / ३७
२९. सुट्टी / ३८
३०. उन्हाळा / ३९
३१. नको हा उन्हाळा / ४०
३२. ससोबांची करामत / ४१
३३. पाऊस आला / ४२
३४. अरे पावसा / ४३
३५. पोळा / ४४
३६. चिऊची शाळा / ४५
३७. काव काव कावळ्या / ४६
३८. मोराची सिनेमा कंपनी / ४७
३९. प्राणी माझे आवडते / ४८
४०. बातमी / ४९
४१. संत उंदीरमामा / ५०
४२. युक्ती / ५१
४३. मामांचा स्टुडिओ / ५२
४४. चंगळ / ५३
४५. बारसं / ५४
४६. माऊचे घर / ५५
४७. मोत्याचे स्वप्न / ५६
४८. लंबकर्ण / ५७
४९. पोस्टमन / ५८
५०. भूकंप / ५९
५१. कोल्ह्याचा कावा / ६०
५२. वाघोबांची शाळा / ६१
५३. मेजवानी / ६२–६३
५४. कटकट / ६४

# छोट्या दोस्तांनो,

सारखा सारखा अभ्यास करून तुम्हाला खूपदा कंटाळा येत असेल ना? मग अशा वेळी तुम्ही काय करता? छोटू, गोटू, मोंटू मैदानात क्रिकेट खेळायला जात असतील. चिंगी, ठमी, छकुली भावला—भावलीचं लग्न नाहीतर भातुकलीचा खेळ मांडत असतील. चिंटू, बंटी, चंदू बागेत जाऊन लपाछपीचा खेळ खेळत असतील. झाडावर चढून कैऱ्या, जांभळं, पेरू, आवळे, चिंचा खात असतील आणि दोस्तांनाही देत असतील.

पण हेच दिवस जर उन्हाळ्याचे असतील तर? दुपारी आई बाहेर खेळायला जाऊ देईल का? नाहीच मुळी. उन्हात खेळून तुम्हाला ऊन लागलं तर? ताप आला तर? 'एऽऽ, सगळेजण गुपचूप कूलरमध्ये झोपा. कुणी नाही उन्हात बाहेर जायचं' असं बाबा किंवा आजोबा म्हटल्याशिवाय राहतील का?

आणि पावसाळ्याचे दिवस असतील तर? बाहेर मुसळधार पाऊस पडत असेल तर मग फक्त खिडकीतून किंवा गॅलरीतून बाहेरची गंमत बघायला मिळेल. तुमच्यापैकी कुणी बाहेर भिजायला जातो म्हणाल तर बाबा नुसते रागवणार नाहीत, छडीसुद्धा काढतील. पावसात भिजून सर्दी झाली तर डॉक्टरकाकांना बोलवावं लागेल ना? आणि मग औषधं, इंजेक्शनं घ्यायला लागतील. असं आजारीपण नको ना तुम्हाला?

किती किती कंटाळा येतो घरात बसून! कधी कधीतर खेळायला कोणी नसतं. दादा नि ताई त्यांच्या काहीतरी उद्योगात दंग असतात. अभ्यास तर नको वाटतो. मग काय करणार?

छोट्या दोस्तांनो, अशा वेळी आपण छान छान पुस्तकांना आपले दोस्त बनवायचं. छोट्या छोट्या गोष्टी, गाणी, कविता, नाटुकली असं छान छान साहित्य वाचायचं. अशा वाचनात तुमचा वेळ कसा भुर्रकन निघून जाईल, ते तुम्हाला कळणारसुद्धा नाही. आणि मग 'कंटाळा आलाय, आता काय करू?' असं म्हणायला सवडच मिळायची नाही. हे सगळं लक्षात घेऊन खास तुमच्यासाठी गमतीजमतीने सजविलेलं सुंदर कवितांचं मंजुळ गुंजारव करणारं, तुम्हाला आनंद देणारं हे एक छोटंसं पुस्तक सादर करतोय. आवडलं तर नक्की कळवायचं हं मला.

— पवनदादा

# द्वितीयावृत्तीच्या निमित्ताने

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजनेअंतर्गत या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीला अनुदान मिळाले होते. 'गमभन प्रकाशन', पुणे यांनी १ सप्टेंबर २००० रोजी 'किलबिलाट'ची प्रथमावृत्ती प्रकाशित केली होती. संस्कारी बालमेवा असलेल्या हे पुस्तक अल्पावधीतच विकल्या गेल्याने त्याची दुसरी आवृत्ती काढण्याचा मानस फार पूर्वीपासून होता, तो आज 'सेवा प्रकाशन' अमरावतीच्या माध्यमातून पूर्ण होत आहे.

छोट्या दोस्तांसाठी खास बडबडगीते आणि कवितांचा हा संग्रह आहे. नर्सरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांवर संस्कारक्षम मूल्ये रुजविण्यासाठी शाळांकरिता हे पुस्तक उपयुक्त आहे.

— पवन मांडवकर

# पूर्वप्रसिद्धी

किशोर मासिक, पुणे
आनंद मासिक, पुणे
कुमार मासिक, पुणे
मुलांचे मासिक, नागपूर
दैनिक लोकमत, नागपूर
दैनिक तरुण भारत, नागपूर
दैनिक जनवाद, नागपूर
दैनिक नवराष्ट्र, नागपूर
दैनिक हिंदुस्थान, अमरावती
दैनिक जनमाध्यम, अमरावती
दैनिक देशोन्नती, अकोला



## प्रार्थना

गज आनना
तू पावना
सत्संग दे
सद्बुद्धी दे

सत्कार्य हे
घडवी सुखे
विघ्ने हरी
तू श्रीहरी

मन:शुद्धी ही
करी सत्वरी
सन्मार्गी न्या
मम जीवना

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'साहित्य मैफील', दै. हिंदुस्थान, अमरावती, दि. ११–०८–१९९६
'घरसंसार' पुरवणी, दै. तरुण भारत, नागपूर, दि. १४–०९–१९९६)



## वंदन

आधी आईला वंदन
मग आप्तांचा तो मान
गुरुजींचा आदर
नम्रतेने करणार

आज्ञा पाळून साऱ्यांची
सेवा करूया देशाची
सत्य अहिंसा बंधुत्व
गांधीजींचे मानू तत्त्व

संस्कारांची ही शिदोरी
जपुनिया प्राणापरी
लावू अंतरी अंतरी
ज्ञानदीप घरोघरी

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी 'साहित्य मैफील' पुरवणी,
दै. हिंदुस्थान, अमरावती दि. १४–१२–१९९७)

# साप्ताहिकी

शिवशंभूचा लाडका वार । माझे नाव सोमवार ।।
अभ्यासाचा त्रास फार । मुले म्हणती घातवार ।।

अंबा लक्ष्मी सरस्वती । मंगळवारच्या देवी किती ।।
मंगळागौर पुजायची । खिरापत सगळी वाटायची ।।

विठोबाचा आजचा वार । माझे नाव बुधवार ।।
जर का निघाला प्रवासास । लोक म्हणती होईल त्रास ।।

दत्तगुरूला घाला हार । माझे नाव गुरुवार ।।
नैवेद्य द्या पेढ्याचा । संसार होईल सुखाचा ।।

चणे फुटाणे घेऊनच चला । तिरुपतीच्या बालाजीला ।।
दुर्गेला पण घाला हार । माझे नाव शुक्रवार ।।

शेंदूर लावा तेल घाला । आज आहे शनिवार ।।
जय भीमाचा जयजयकार । घाला सारे नमस्कार ।।

सूर्यदेवाची पूजा करा । साऱ्यांचा जीवनदाता खरा ।।
सुटीचा हा रविवार । लहानथोरा आवडे फार ।।

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'बालरंजन', दै. जनवाद, नागपूर, दि. १२–०४–१९९८)



# गाव आपले सुखी करू

यारे सारे एक होऊनी लागू कामाला ।
कष्ट करुनीया सारे मिळूनी सुखवू ग्रामाला ।।

भेदभावा विसरूनी जाऊ, जातीयता सोडू ।
आपण सारे बंधू भगिनी प्रेमभाव जोडू ।।

वृक्ष वाढवू, प्रदूषणाचे संकट दूर करू ।
मानवतेच्या कार्यासाठी हाती हात धरू ।।

कुणीच नाही राव इथे अन् कुणी नाही रंक ।
सुखसमृद्धी भोगू सारे नको कुणा दुःख ।।

लोभ मोह अन् मत्सर सोडू, प्रेम देऊ घेऊ ।
कुटुंब अमुचे अशी एकता जगताला दावू ।।

हुंडाबळी अन् सासुरवासा प्रेमे दूर करू ।
नातर सारे विरोध करण्या मशाल हाती धरू ।।

मद्यपान सिगरेट बिडीसह तंबाखू व्यसने ।
घातक सारी म्हणून तयांना हातही न लावणे ।।

दुष्ट रूढी अन् परंपरा ज्या ज्या जाचक असती ।
नायनाट करू सत्वर त्यांचा, सुखी करू वस्ती ।।

मुलामुलींना शिक्षण क्षेत्री समान द्या संधी ।
उच्चनीचता विसरूनी सारे होऊ आनंदी ।।

कर्तव्याची जाणीव ठेवू हक्का ना विसरू ।
भारतीय संस्कृतीचा झेंडा जगतावरी पसरू ।।

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – आनंद मासिक, पुणे, मार्च १९९१)






# स्वप्न माझे

सहलीला चला जाऊ
निसर्गाची गाणी गाऊ
रानीवनी बागेमध्ये
वृक्ष सावलीत न्हाऊ



ससे मोर हरणांचा
येथे कळप दिसतो
कमळांच्या समवेत
हंस पाण्यात पोहतो




चिऊ काऊची घरटी
खार फुलवी शेपटी
फुलपाखरे पोपट
रंगीबेरंगी नाचती



झाडावरती रात्रीला
दिवे काजव्यांचे लाख
दिवाळीची ही आरास
पशुपक्षांची रानात



हत्ती सोंडेने पाण्याचे
पहा कारंजे उडवी
लोकरीचा पांघरून
मेंढी स्वेटर झुलवी



भिऊ नका येथे जरी
वाघ आहे सिंह आहे
साप अजगर विंचू
मैत्री त्यांना प्रिय आहे

शिकाऱ्यांना रोखू आम्ही
घालवूया त्यांची भीती
रानातले प्राणी सारे
मित्र आपले बनती



करू वृक्ष संरक्षण
रोखू तोडणारे हात
झाडाझुडपांची रक्षा
मानवाची सेवा होत



असे प्राणी झाडे माझी
तुम्हालाही दाखवू का?
यावे लागेल सोबत
स्वप्नी माझ्या रात्री एका

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी 'साहित्य मैफील' पुरवणी, दै. हिंदुस्थान,
अमरावती दि. ०७–०२–१९९७
रविवार पुरवणी, दै. जनवाद, नागपूर दि. ०२–०८–१९९८
'घरसंसार' पुरवणी, दै. तरुण भारत, नागपूर दि. १२–०९–१९९८
'साहित्य मैफील' पुरवणी, दै. हिंदुस्थान, अमरावती दि. ०७–०९–१९९९)

# आईची दिनचर्या



पाचला पहाटे
गजर होतो
आईच्या कामाचा
आरंभ होतो

सहा वाजता
चहा आटोपतो
सात वाजता
गिझर तापतो



आठ वाजता
गॅस पेटतो
नऊ वाजता
कुकर लागतो

दहा वाजता
जेवणे होतात
अकराला सारे
कामाला जातात



बाराला आई
कामे आवरते
एक वाजता
एकटीच जेवते

दोनला आजी
चहा मागते
तीनला छोटी
घरी येते

चार वाजता
शंकरपाळे होतात
पाचला सगळे
घरी परततात

सहापर्यंत
खाणे चालते
सातला आई
कणिक भिजवते

पाटपाणी तयारीत
आठ वाजतात
नऊला रात्रीची
जेवणे होतात

दहाला आई
कामे आटोपते
अकरा वाजता
झोपायला जाते



☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — रविवार पुरवणी, दै. जनवाद, नागपूर, दि. ०१—०२—१९९८
'घरसंसार' पुरवणी, दै. तरुण भारत, नागपूर, दि. ०५—१०—१९९६)



## असं मी ठरवलं

हट्ट कधी करायचा नाही
त्रास कोणाला द्यायचा नाही
कुणाशीच भांडायचं नाही
असं मी ठरवलं आई

शाळेला बुट्टी मारायची नाही
वाटेत कधी थांबायचं नाही
शाळेला उशीर करायचा नाही
असं मी ठरवलं आई

चोरून कधी खायचं नाही
खोडी कुणाची काढायची नाही
उलट उत्तरे द्यायची नाही
असं मी ठरवलं आई

स्वप्नात जरी हे ठरवलं आई
सगळं मला का जमणार नाही?
हसतील जरी गं दादा ताई
तरी मी प्रयत्न करणार आई

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ०८–०२–१९९८)




# भारत दर्शन

शाळेमध्ये रोज कशाला शिकवता अ आ इ
कधीतरी वेगळं काही शिकवा ना बाई

मला नाही आवडत लिहायला श्री गणेशा
काढावासा वाटतो इथे भारताचा नकाशा

उत्तरेचा हिमालय आहे तरी कोठे?
मध्य प्रदेशाचे राज्य आहे का मोठे?

दक्षिणेला उसळतो का हिंदी महासागर?
पूर्वेला बंगालखाडी, पश्चिमेस अरबी समुद्र

दिल्ली मद्रास मुंबई आणि कुठे आहे पुणे?
कलकत्त्याची लोकसंख्या खूप आहे म्हणे

कशासाठी लिहायचे मग बेकंबेचे पाढे?
संपूर्ण भारत दर्शन ध्येय आमच्या पुढे

☼☼☼


(पूर्वप्रसिद्धी – 'साहित्य जत्रा', दै. लोकमत, नागपूर, दि. २२–०३–१९९८)





# जत्रा

आमच्या गावी जत्रा भरली
लहान थोरांची गर्दी जमली
भक्तांनी सजवले देवीला
लांब लांब रांगा दर्शनाला
रंगला होता गारुड्याचा खेळ
बाजूला होती पाणीपुरी भेळ
सजला हत्ती डुलत होता
मुलांना डावडाव करीत होता
उंट होते घोडेही होते
गरगरणारे झुलेही होते
चंगळ होती खाण्याची
वर मेजवानी खेळांची
जत्रेत लोक दुरून आले
चैन करून निघून गेले
अशी गावची जत्रा झाली
'पुन्हा येईन' सांगून गेली




☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'साहित्य जत्रा', दै. लोकमत, नागपूर, दि. १५–०३–१९९८)

# कसे वागावे?



पहाटे उठावे
कोंबड्यासारखे
दात चमकावे
हत्तीसारखे




वेगात पळावे
हरणासारखे
नाचत जावे
मोरासारखे



उड्या माराव्या
माकडासारख्या
खोड्या कराव्या
अस्वलासारख्या

गोड बोलावे
पोपटासारखे
इमानी असावे
कुत्र्यासारखे



मधुर गावे
कोकिळेसारखे
शूर बनावे
सिंहासारखे

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — गुरुवार पुरवणी, दै. लोकमत, नागपूर, दि. २१—३—१९९६)

# भाजीवाला

हा आमचा भाजीवाला
हातगाडी घेऊन आला
'भाजी घ्या भाजी' म्हणत
घरोघरी फिरू लागला

लाल पांढरे कांदे आणि
लहान मोठे छान बटाटे
हिरवी मिरची कोथिंबीर
लालचुटुक हे टमाटे



पालकाची ताजी जुडी
मेथी अद्रक अंबाडी
दुधी भोपळा घ्या हो भेंडी
गाजर लिंबू कोवळी काकडी

भरताची वांगी छानदार
ताजी ताजी आहे गवार
ढेमशी रताळी आणि मटार
घ्या भाज्या हिरव्यागार

'आज नगद कल उधार'
म्हणत आमचा भाजीवाला
हातगाडी ढकलत आला
भाज्या विकून निघून गेला

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'वसंत बहार', दै. जनवाद, नागपूर, दि. २७—०५—१९९८
'बालनगरी', दै. हिंदुस्थान, अमरावती, १२—०७—१९९८)

# जादूगार



चला हो चला
सगळे चला
जादूचे प्रयोग
बघायला चला
निळा सूट काळा बूट
फेटा बांधला हिरवागार
त्यात लाल तुरा खोवून
तय्यार झाला जादूगार
छडी घेऊन हाती
म्हणतो छू मंतर
खोक्यातून निघतं
शुभ्र कबुतर



डब्यावर घालतो
कसलासा मंत्र
डब्यातून निघतं
लालीलाल संत्र
यंत्रामध्ये घालतो
कोराच कागद
त्यातून निघते
नोट अलगद
छान छान प्रयोग
करतो जादूगार
म्हणून आम्हाला
आवडतो फार

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी 'मौज सुट्टांची', दै. जनमाध्यम, अमरावती ११–०६–१९९६)

# चष्मा



आजीची आरशी
बाबांची चाळीशी
दादा लावतो स्पेक्टॅकल
माझा आहे काळा गॉगल

कॉन्टॅक्ट लेन्सेस ताईची
नवऱ्याला नाही कळायची
आजोबांच्या कानाला दोरी जाडी
आईच्या चष्म्याची सोनेरी काडी



बाळूचे डोळे तजेलदार
तीक्ष्ण नजरेची जशी धार
डोळ्याचा तो डॉक्टर होणार
सर्वांच्या काचांना सुट्टी देणार



☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — किशोर मासिक, पुणे, मार्च १९८४
दै. देशोन्नती, अकोला २२–११–१९८६)






# आमची व्हिकी

बाबांनी आणली व्हिकी घरात
त्यावर निघाली आमची वरात
चालवायला बसले बाबा पुढे
मागच्या सीटवर आईही चढे
आईच्या मांडीवर बाळूचा थाट
बेबी आमची कमी का छाट?
धरले कॅरियर चढली चटकन्
बाबांनी मारली किक पटकन्
खाली राहिलो मीच एकटा
व्हिकीवर जागेचा भलताच तोटा
धावत निघालो त्यांच्या मागून
हातात बेबीचा फ्रॉक धरून
गावातून बाबांनी मारली चक्कर
रस्त्यात म्हशीने दिली टक्कर
धाडधाड सगळो कोसळलो
स्वप्नातून मी जागा झालो

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — मुलांचे मासिक, नागपूर, मे १९८९)

# रेडिओ



सहा वाजता
भूपाळी म्हणतो
रेडिओ साऱ्यांना
झोपेतून उठवतो

पाळण्यात बाळ
रडत असतो
तेव्हा हा रेडिओ
अंगाई गीत गातो

सगळ्यांना जेव्हा
कामाची घाई
रेडिओ गातो
गोड शहनाई

अभ्यासात दंग
आम्ही असतो
जोरात सिनेगीत
तेव्हा हा म्हणतो



कामे आटोपून
रात्री ऐकू म्हणतो
तेव्हा हा वेडा
शुभरात्री म्हणतो

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. १६—११—१९९७)

# आमच्या गाड्या



पांगुळगाडा बाळासाठी
बाबागाडी मिनीसाठी

तीनचाकी सायकल चंदूची
मन्याला स्कूटर मुलांची

ताईची लेडीज सायकल छान
एम फिफ्टीवर बंड्याची शान



आई ऑफीसात लुनाने जाते
मला जुनी लॅम्ब्रेटाच मिळते

व्हिकी झाली आऊट ऑफ ऑर्डर
बाबा जाता मस्त व्हेस्पावर


काकांनी आणली मारुती कार
आत्यासाठी फियाट तयार

काकूची आहे टीव्हीएस फिफ्टी
गॅरेजमध्ये गाड्यांची गर्दीच मोठी

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – किशोर मासिक, पुणे, ऑगस्ट १९८८)





# बाहुली

माझी बाहुली
खूपच छान
आहे किंचित
तिरकी मान



गाल गोबरे
इवले कान
गोड बोलुनी
डोलवी मान

केस कुरळे
दिसती छान
रंगाने ही
गोरी पान

उभी करता
खुदकन हसते
आडवी करता
डोळे मिटते



क्षणात रुसते
क्षणात हसते
किल्ली देताच
नाचत सुटते

लागत नाही
मान पान
अशी माझी
बाहुली छान

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'साहित्य जत्रा', दै. लोकमत, नागपूर, दि. २२–०३–१९९८)

# धम्मक लाडू



आईने छान
लाडू केले
माळ्यावरच्या
डब्यात ठेवले

दुपारच्या वेळी
आई झोपली
मित्र मंडळी
येऊन पोचली



चढून खुर्चीवर
डबा काढला
धांदलीमध्ये
धपकन पडला

मिळाले नाही
खायचे लाडू
पाठीत बसले
धम्मक लाडू

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'साहित्य जत्रा', दै. लोकमत, नागपूर, दि. १५–०३–१९९८)



# माझा स्वयंपाक

एकदा तर चाखून बघा
मी केलेला स्वयंपाक
बिस्किटाच्या पोळ्या
नि पिठीसाखरेचे ताक

चॉकलेटची रस्साभाजी
आत्ताच केली ताजीताजी
लिमलेटच्या गोळ्यांची
उसळ खाऊन व्हाल राजी


लाडू शोपेच्या गोळ्यांचा
मुरमुऱ्यांचा भात मस्त
शेंगदाण्यांच्या पिठाचा शिरा
सगळा करू नका फस्त



डाळवा घालून मस्तपैकी
शिजवलं आहे वरण
झालं की नाही आता बोला
तुमचं उदर भरण?

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी— 'सुटीतील मौजमजा', दै. तरुण भारत, नागपूर, ०४—०६—१९९५)




# भोजन भाऊ

माझे जेवण – खाणे
माझे जेवण खाणे ।।धृ।।
लाडू असो बासुंदी असू दे
शिरापुरी वा बुंदी असू दे
पोटी जागा असू नसू दे
खातची नित्य राहणे – खाणे माझे जेवण खाणे ।।१।।
शंकरपाळे चकली शेवया
करंजी पेढा बर्फी खावया
दूध मसाला खीर प्यावया
नाही वाट पाहणे – खाणे माझे जेवण खाणे ।।२।।
चटणी भाकरी मजला चाले
बेसन भातही नाही त्यजिले
चविष्ट भोजन जरी न मिळाले
आनंदाने खाणे – खाणे माझे जेवण खाणे ।।३।।
तुंदिलतनू मी गणेशापरी
ताव मारितो भोजनावरी
पसरो माझी कीर्ती भूवरी
सततची खाणे – खाणे माझे जेवण खाणे ।।४।।

☼☼☼


(पूर्वप्रसिद्धी – दै. देशोन्नती, अकोला १२–०७–१९८६)

# भाज्यांचे भांडण




बाजारातून आईने
किती भाज्या आणल्या?
उगीचच बघा त्या
भांडायला लागल्या

 काकडी म्हणाली
 तांबड्या भोपळ्याला
 'खा खा खातोस
 नि गलेलठ्ठ होतोस'



भोपळा म्हणाला
काकडीबाईला
'लुकडूबाई ये ना
कुस्ती खेळायला'

 कांदोबा म्हणाले
 लाल टमाट्याला
 'कापूस जसा
 पिचकलेला'




टमाटा म्हणाला
कांदोबांना
'वास मारताय
आंघोळ कराना'

 भाज्यांच्या भांडणात
 टोपली उलटली
 सगळ्यांची रवानगी
 फ्रीजमध्ये झाली

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'घरसंसार' पुरवणी, दै. तरुण भारत,
नागपूर, दि. ०५–१०–१९९६)




# चौकस चिंगी



प्राणी संग्रहालयात चिंगी गेली
गुरुजींना प्रश्न विचारू लागली
सिंहाची आयाळ वाढली किती?
वाटते का त्याला न्हाव्याची भीती?
हत्ती हा इतका लठ्ठ कसा?
भरलाय का त्याच्या पोटात भुसा?
अस्वलाचा रंग काळा कसा?
आंघोळीविनाच राहतो जसा



झेब्राच्या पाठीवर कसले पट्टे?
मारलेत का कोणी त्याला रट्टे?
उंटोबा काय म्हातारे झाले?
म्हणून हे पाठीला पोक आले
चिंगीच्या प्रश्नांना सर्वच हसले
गुरुजींनी मात्र डोकेच धरले

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ०४–०१–१९९८)

# शाहणा चिंटू

आमचा चिंटू
पहाटे उठतो
कडुलिंबाने
दात घासतो ।।१।।

पळत पळत
टेकडीवर जातो
व्यायाम करून
परत येतो ।।२।।

शक्तीसाठी
दूध पितो
मन लावून
अभ्यास करतो ।।३।।

आंघोळ करतो
जेवून घेतो
दप्तर घेऊन
शाळेत जातो ।।४।।

शाळा सुटताच
घरी येतो
खेळण्यासाठी
मैदान गाठतो ।।५।।

खेळून दमतो
जेवण करतो
झोपण्यापूर्वी
अभ्यास करतो ।।६।।

परीक्षेत नेहमी
पहिला येतो
स्पर्धांमध्ये
भाग घेतो ।।७।।

खूप सारी
बक्षिसे आणतो
साऱ्यांचाच तो
मित्र बनतो ।।८।।

मोठ्यांचा तो
आदर करतो
आम्हाला त्याचा
अभिमान वाटतो ।।९।।


☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'साहित्य मैफील',
दै. हिंदुस्थान, अमरावती,
दि. ०३–०५–१९९८)



# शूर ठमी

मिशीवालं झुरळ
घरभर फिरतं
उंदराला पाहताच
तुरुतुरु पळतं





उंदीर मामा
धान्य खातात
मनीमाऊला
घाबरतात


मनीमाऊ
दूध पिते
आकू येताच
धूम पळते





आकू हा धीट
भाजीपोळी खातो
ठमीच्या काठीला
खूपच भितो

शूर आमची
ठमी ताई
भीत नाही
कुणाला बाई



सर्वांना जरी
नाचवत असते
झुरळ दिसताच
नाचत सुटते

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालविभाग, 'घरसंसार' पुरवणी,
दै. तरुण भारत, नागपूर, दि. १७–०८–१९९६)

# बालवाडी

बालवाडीत रोज जातो
माझा लहान भाऊ
असं सांगतो रोज तिथे
खायला मिळतो खाऊ



सांगू त्याच्या शाळेमध्ये
अभ्यास असतो कसा?
पुस्तकातली रंगीत रंगीत
चित्रे पाहत बसा

वाघ सिंह हत्तींच्या
गोष्टी सांगतात बाई
छोटे छोटे चिंगी मुन्ना
बाईंना म्हणतात ताई



येता आठवण आईची
मुलं लागतात रडायला
चॉकलेट बिस्कीट पेपरमिंट
खाऊ मिळतो खायला

बालवाडी बालकमंदिर
आमच्यावेळी नव्हतं
शिस्त प्रेम संस्कार पाहून
मलाही जावंसं वाटतं



☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ०४—०१—१९९८)



# निलूची परीक्षा

निलूची परीक्षा जवळ आली
अभ्यासाची तयारी सुरू झाली
कोणत्या विषयाला हात लावावा?
कशाचा अभ्यास प्रथम करावा?
गणिताची उदाहरणे होतील पटकन
शास्त्राचे प्रयोग जमतील झटकन
मराठी वाचायची गरजच नाही
इंग्रजी पहायची इच्छाच नाही
सोपाच तर आहे इतिहास सगळा
भूगोलाचा नकाशा मिळेलच वेगळा
सामाजिक शास्त्र जमेल कसंतरी
अशी झाली निलूची तयारी
विचारातच स्वारी झोपी गेली
बघितले स्वप्न नि पासही झाली

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी, दै. जनवाद, नागपूर, दि. ०४–०१–१९९८)

# चंदू

आजोबांची काठी
चंदू पळवतो
घोडा करून
घरभर फिरतो




      आजीचा चष्मा
      डोळ्याला लावतो
      पेपर वाचायचे
      नाटक करतो



वेताची छडी घेऊन
शाळा मास्तर बनतो
'हात पुढे कर'
बेबीला म्हणतो

      पोळपाट लाटणे
      आईकडून घेतो
      भारत सिलोनचे
      नकाशे लाटतो



इंग्रजीचे पुस्तक
दादाकडे मागतो
'येस नो थँक्यू'
बडबड करतो



      शूर शिपाई
      आहे मी म्हणतो
      उंदराला पाहून
      धूम पळतो

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ११–०१–१९९८)

# आजीचे दात


आजी मला
सांगतेस का?
दातात तुझ्या
जादू आहे का?



किती शुभ्र हे
मोत्यासारखे
रांगेत एका
डाळिंबासारखे

हवे तेव्हा तू
काढून ठेवतेस
जेवताना छान
लावून घेतेस

पण आज मला
गंमत कळली
दादांची कवळी
नीट बघितली



तुला दिले दात
डॉक्टर काकांनी
मला मात्र
देवबाप्पानी



☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'घरसंसार' पुरवणी, दै. तरुण भारत,
नागपूर, दि. १८–०४–१९९८)


# सुट्टी



गुरुजी म्हणाले
परीक्षा संपणार
सुटीत कोण
कुठे जाणार?


मनू म्हणाला
पुण्याला जाणार
पेशवे पार्कात
खूप खेळणार

चिंगी म्हणाली
कोल्हापूर पाहणार
महालक्ष्मीची
पूजा करणार



गोटू म्हणाला
नागपूरला जाणार
बगिच्यांमधली
संत्री खाणार

डॉली म्हणाली
मुंबई बघणार
एलिफंटाची
सहल करणार




रामू म्हणाला
सगळे जाणार
गरुजींजवळ
मी राहणार

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ०४–०१–१९९८)

## उन्हाळा



परीक्षा संपली
सुटी लागली
उन्हाळ्यातली
मजा सुरू झाली
    अभ्यास नाही
    नुसते खेळणे
    गोष्टींची पुस्तके
    वाचत लोळणे



आंब्याच्या रसाची
रोजच धमाल
टीव्ही व्हिडीओत
संपते दुपार
    कुलरची छान
    हवा गारीगार
    आईस्क्रीम कुल्फी
    खाऊ वारंवार



असा उन्हाळा
जरी तापतो
आम्हाला खूप
खूप आवडतो

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'वसंत बहार', दै. जनवाद, नागपूर, दि. २५–०५–१९९८)

# नको हा उन्हाळा

दरवर्षी देवा
आणतोस उन्हाळा
घामाने सगळ्या
कामाचा कंटाळा




सकाळी जावे
लागते पोहायला
आल्यावर फक्त
सत्तू खायला



दुपार घरात
काढावी लागते
बाहेर गेल्यास
आई रागवते

देवा गर्मीचा
आलाय कंटाळा
संपव एकदाचा
रखरख उन्हाळा




☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'वसंत बहार',
दै. जनवाद, नागपूर,
दि. २५–०५–१९९८)


# ससोबांची करामत

देववृक्षतळी
ससा पहुडला
जवळच नारळ
धपकन पडला



भित्रा ससोबा
पळायला लागला
आभाळ कोसळले
ओरडू लागला

वारा घाबरला
तोही बिथरला
जोरजोराने
वाहू लागला



ढगावर ढग
आपटू लागले
मोठा गडगडाट
करू लागले

वीजही भीतीने
थरथरू लागली
काळ्या आकाशी
चमकू लागली



सरीवर सर
कोसळू लागली
धरणीमाता
चिंब झाली

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'बालरंजन', दै. जनवाद, नागपूर, दि. ३१—०५—१९९८
दै. हिंदुस्थान, अमरावती, दिवाळी अंक, १९९८ )




# पाऊस आला

आला आला पाऊस आला
मुलाफुलांना आनंद झाला
नवीन पानं नवीन फुलं
हिरवंगार गवत आलं
नद्या तलाव विहिरी नाले
पाऊस येता तुडुंब भरले
रस्त्यारस्त्यात डबकी साचली
कागदी होड्यांची शर्यत लागली
जारे उन्हाळ्या बाय बाय
आता आम्हाला पाऊस हवाय



कूलर लावून नका निजू
रिमझिम पावसात चला भिजू
नांगरल्या शेतात पेरणी करू
दिवाळीत धान्याच्या कणग्या भरू
सुजलाम सुफलाम भारत देश
पावसाच्या मनात हाच उद्देश



☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'वसंत बहार', दै. जनवाद, नागपूर, दि. २२–०६–१९९८)

# अरे पावसा

अरे पावसा
थांबशील का?
सूर्यदर्शन
देशील का?



घराभोवती
चिखल होतो
पाय घसरून
आम्ही पडतो

शाळेत जाताना
भरतात पाय
गुरुजी म्हणतात
नाचलास काय?

सर्दी होते
डोके दुखते
कडू औषध
प्यावे लागते



म्हणून पावसा
थांबशील का?
सूर्यदर्शन
देशील का?

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'बालरंजन', दै. जनवाद, नागपूर,
दि. २८–०६–१९९८)

# पोळा

आला सण हा पोळ्याचा
शेतकऱ्यांच्या बैलांचा
राबराबती वर्षभरी
आज विसावा जरा तरी
घासून पुसुनी स्वच्छ करा
शिंगा, अंगा त्या रंग भरा
पाठी चढवा नव्या झुली
गळ्यात बांधा घुंगुरवाळी



मखर बांधुनी माथ्याला
ढवळ्या पवळ्या वेशीला
गावकऱ्यांचा भरला मेळा
तोरण तुटले सुटला पोळा
बैल घेऊनी अपुलाले
घरोघरी धावत सुटले
पाय धुवून टिका लावती
माता भगिनी ओवाळिती
पुरणपोळी मग नैवेद्याची
खाऊनी तृप्ती हो बैलांची




☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. १—०२—१९९८)


# चिऊची शाळा

चिऊने एक
शाळा काढली
चिमणी पिले
गोळा झाली





झाडाखाली शाळा
बाजूला मळा
हत्तीच्या पाठीचा
केला होता फळा

चिऊ शिकवते
अ आ इ ई
कंटाळा येता
गाते अंगाई



पिले म्हणती
नको ही शाळा
शिकवत नाही
दाणे टिपयला



पिले सगळी
निघून गेली
चिऊची शाळा
बंद पडली

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — साहित्य जत्रा, दै लोकमत,
नागपूर, दि. २१—०७—१९९६)

# काव काव कावळ्या



काव काव कावळ्या
काय रे ओरडतोस?
पाहुणेच पाहुणे
आणत असतोस ।।१।।



सारखे सारखे
पाहुणे येतात
माझ्या अभ्यासात
व्यत्यय आणतात ।।२।।



आईच्या मागे
कामही वाढते
सरबराई त्यांची
करावी लागते ।।३।।

बाळा हे आण
बाळा ते आण
मलाही पडतो
कामाचा ताण ।।४।।



एखादा पाहुणा
मला आवडतो
छान खाऊ तो
घेऊन येतो ।।५।।

कधी सगळ्यांना
सिनेमाला नेतो
गोड आईस्क्रीम
खाऊ घालतो ।।६।।



असे छान पाहुणे
आणत जा
नाहीतर रानात
पळून जा ।।७।।

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'वसंत बहार', दै. जनवाद, नागपूर, दि. २६–०५–१९९८)

# मोराची सिनेमा कंपनी



पक्ष्यांच्या नगरीत
धम्माल झाली
मोराने सिनेमा
कंपनी काढली

पोपटाने छानशी
पटकथा लिहिली
दिग्दर्शिका म्हणून
मैनाराणी आली

चिमणा झाला नायक
नि चिमणी नायिका
गोड गळ्याची कोकिळा
झाली पार्श्वगायिका

खलनायक झाला
काळाकुट्ट कावळा
विदूषकाच्या कामासाठी
पसंत पडला बगळा


असा सिनेमा
तयार झाला
पण नाच मोराचा
राहून गेला



म्हणून लांडोर
रुसून बसली
नि सिनेमा कंपनी
बंद पडली


☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी, दै. जनवाद, नागपूर, दि. १६–११–१९९७, कुमार मासिक, पुणे, जून १९९९)



# प्राणी माझे आवडते

कपिला काळी आमची गाय
चारा सरकीच्या दुधाची साय
    उकिरड्यावर गाढव चरते
    गोण्या वाहून मेहनत करते



गवळ्याकडे पाहिली म्हैस
ऊठसुठ चिखलात बैस
    मुंग्या छान रांगेने जातात
    कणकण साखर वेचतात
खार सरसर पळत जाते
कुणाला माहीत काय खाते
    लांब शेपटी उंदराची
    करतो नासाडी धान्याची



मनीमांजरी दबकत येई
दुधाची साय चाटून जाई
    मोत्या कुत्रा इमानदार
    मटण भाकरी आवडे फार

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — दै. देशोन्नती, अकोला दि. ०५—०७—१९८६)

# बातमी

ग्रंथालयात शिरून एकदा
उंदराने एका कमाल केली
कागद कुरतडण्याऐवजी
बातमी सगळी वाचून घेतली

मनीमाऊचा फोटो पाहून
कळी त्यांची खूपच खुलली
बातमी होती लिहिलेली
वाघाची मावशी मरून गेली

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — गुरुवार पुरवणी, दै. लोकमत, नागपूर, दि. ११—०४—१९९६)






# संत उंदीरमामा



उंदीरमामा उंदीरमामा
हे कसले हो सोंग?
भगवे कपडे घालून
काय रचले ढोंग?

हातामध्ये गळ्यामध्ये
किती घातल्या माळा?
डोळे मिटून मणी ओढून
उगीच करता चाळा


भोवताली अजाण उंदीर
कशासाठी हो गोळा करता?
निरर्थक बडबड करून
प्रवचनाचा आव आणता



धीटपणाच्या शूरत्वाच्या
कशाला हो बाता करता?
मनीमाऊ समोर दिसताच
काहो धूम पळत सुटता?


☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'बालविहार', दै. देशोन्नती, अकोला, ०७–०७–१९९६)




# युक्ती

उंदीरमामाला
भूक लागली
शोधता तेलाची
बाटली दिसली



बाटलीत मामाचे
तोंड जाईना
खोबऱ्याचे तेल
चाटता येईना

युक्ती सुचली
उंदरीणीला
ऐकून मामा
खूष झाला




घातली शेपटी
बाटलीमध्ये
काढून चोखली
ऐटीमध्ये

☼☼☼


(पूर्वप्रसिद्धी — कुमार मासिक, पुणे, फेब्रुवारी २००१
'अक्षररंग', दै. लोकमत, नागपूर, दि. १६—०९—२००१)

# मामांचा स्टुडिओ



जंगलामध्ये मामांना
कॅमेरा सापडला
तिथेच त्यांनी मस्तपैकी
स्टुडिओ स्थापन केला

चिऊ आली, मैना आली
खार आली, पाल आली
फोटो काढण्यासाठी
गर्दी खूप सारी झाली




उंदीरमामा सांगत होते
'ताठ बसा, जरा हसा'
काहीजण पुढे सरा
मान थोडी वर करा

त्याच वेळी कुठूनतरी
बोके आले दहाबारा
मामा पळाले सैरावैरा
स्टुडिओचे वाजले तीन तेरा

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी, दै. जनवाद, नागपूर, दि. २५–०१–१९९८)





## चंगळ

माऊच्या वाढदिवसाला
मांजरी आल्या चार
गप्पांपेक्षा त्यांचं लक्ष
खाण्यावरच फार



दूध दही तूप लोणी
खीरदेखील वाढली
तोच आमच्या आकूची
स्वारी हजर झाली

आकू दिसताच मांजरींची
सुरू झाली पळापळ
पंगत राहिली अर्धी
आकूची झाली चंगळ

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ११—०१—१९९८)


## बारसं

काळ्याशार मनीमाऊला
पांढरंशुभ्र बाळ झालं
आनंदाच्या भरात तिने
थाटामध्ये बारसं केलं



अंगणातल्या झाडाला
बांधली पक्की सुतळी
रेशमी चादर आणून
लहानशी केली झोळी


झोका देऊन बाळाला
पाळणा म्हटला छान
जमलेल्या मांजरींनीही
लगेच घेतली तान




नाव ठेवल्यावर माऊने
मस्त दिली मेजवानी
चोरून आणलेल्या दुधाची
खीर ओरपली साऱ्यांनी

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ०८–०३–१९९८)




# माऊचे घर




माऊने सोडले
भाड्याचे घर
विकत घेतले
स्वत:चे घर

माऊ जाणार
म्हणून तिला
उंदरांनी साऱ्या
'सेंड ऑफ' दिला





खाणे पिणे
खूप झाले
माऊचे हृदय
भरून आले



घर सोडणे
रद्द केले
उंदीर मात्र
नाराज झाले

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — मुलांचे मासिक, नागपूर, जुलै १९९६
दै. नवराष्ट्र, नागपूर, दि. ०१—०७—२००१
'अक्षररंग', दै. लोकमत, नागपूर, दि. १६—०९—२००१)

# मोत्याचे स्वप्न

मोत्याला एकदा
स्वप्नच पडले
दुधाचे सुंदर
कारंजे दिसले



झऱ्यातून दूध
झिरपत होते
विहिरीत एका
बरसत होते

दुधाची विहीर
संपूर्ण भरली
मोत्याची लाळही
टपकू लागली

दुधाचा घुटका
जिभेने चाटला
तोच डोक्यावर
चेंडू आपटला



छोटी मुले होती
खेळण्यात दंग
मोत्याच्या स्वप्नाचा
पार झाला भंग


☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ०४—०१—१९९८
दै. नवराष्ट्र, नागपूर, दि. ०१—०७—२००१)

# लंबकर्ण

हत्ती एकदा नवस बोलला
अंगारकी चतुर्थीला
दुर्वा वाहीन गणपतीला
आले प्राणी मदतीला






मूर्ती केली कुंभाराने
देवघर केले सुताराने
पशुपक्षी सारे जमले
गणरायाच्या पूजेत रमले

मोदक करायचा बेत ठरला
मनीमाऊने स्वयंपाक केला
डोळे मिटून मंत्र म्हटले
गाढवाने सगळे मोदक लाटले

गणेशाचा झाला अपमान
त्याने ओढले गाढवाचे कान
उकिरडा फंकत मागतो भिक्षा
लंबकर्णाला ही कायम शिक्षा



☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — 'घरसंसार' पुरवणी, दै. तरुण भारत,
नागपूर, दि. १४–०९–१९९६)

# पोस्टमन



रानामधल्या सभेत एका
ठराव असा पास झाला
निरोप देण्या–घेण्यासाठी
पोस्टमन नेमावे एकाला
        पोस्टमन केले माकडाला
        पत्रवाटप सुरू झाले
        खाकी कपडे लाल सायकल
        घेऊन माकड फिरू लागले
सापाचे पत्र गरुडाला
खाऊ नको आम्हाला
शेळीने बोलावले कोल्ह्याला
अंगत पंगत जेवायला




        बैलोबाने वाघोबाला
        ऐटीत ठोकून दिली तार
        गुहेत तुझ्या जागा दे
        बाहेर थंडी वाजते फार
पार्सल गेले खाऊचे
हत्तीकडून हरणाला
राहवले नाही माकडाला
खाऊ सगळा फस्त केला




        सिंहाकडे तक्रार गेली
        त्याने माकडाची शेपूट ओढली
        नोकरी तर गेलीच गेली
        पण शेपूट मात्र लांब झाली

☼☼☼


(पूर्वप्रसिद्धी – कुमार मासिक, पुणे, ऑक्टोबर १९९९)





# भूकंप

हत्तीची एकदा
गाठ पडली
गाढवाने आपली
पुडी सोडली
‘प्राण्यांत सगळ्या
मीच आहे धीट
हिंमत माझी
पारखा नीट’
हत्ती म्हणाला
‘अस्सं काय?’
जमिनीवर त्याने
आपटला पाय





हादरता जमीन
गाढव घाबरले
भूकंप झाला
ओरडत सुटले

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी — मुलांचे मासिक, नागपूर, जुलै १९९६)


## कोल्ह्याचा कावा






कोल्ह्याने एकदा
लबाडी केली
सिंहाबरोबर
योजना आखली ।।१।।

स्वत:च्या लग्नाची
तयारी केली
रानातल्या मित्रांना
पत्रिका दिली ।।२।।




गुबगुबीत ससा
भटजी झाला
आचारी नेमला
बंदर भाऊला ।।३।।



बँड वाजवायला
अस्वल आला
चिल्लर कामे
दिली गाढवाला ।।४।।



सिंहाच्या गुहेत
लग्न ठेवले
पाहुणे सगळे
घाबरून गेले ।।५।।




कोल्ह्याचा कावा
त्यांनी जाणला
कोणीच नाही
हजर राहिला ।।६।।

कोल्हादेखील
पळून गेला
सिंहाला मात्र
उपवास घडला ।।७।।


☼☼☼


(पूर्वप्रसिद्धी – 'मौज सुट्टयांची', दै. जनमाध्यम, अमरावती, ०४–०६–१९९६)

# वाघोबांची शाळा




रानामध्ये वाघोबांनी
शाळा एक सुरू केली
मुख्याध्यापिका म्हणून
हत्तीणीला नेमली






ससोबांनी शिकवला
भूगोल जगावेगळा
विद्यार्थी होता एकच
पांढरा शुभ्र बगळा


इंग्रजी शिकवायला
होत्या मनुताई
शिंपडायच्या सारख्या
पेनामधली शाई



शिकवताना बकरीबाई
कविता मराठीची
चोखायची सारखी
शेंग बाभळीची



अधूनमधून वाघोबा
इन्स्पेक्शनला यायचे
लहान लहान प्राण्यांना
गट्टमपण करायचे




कोल्ह्याच्या युक्तीने
साऱ्यांनी कट केला
वाघाकडे सामूहिक
राजीनामा दिला


☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – 'वसंत बहार', दै. जनवाद, नागपूर, दि. ०१–०६–१९९८
'साहित्य मैफील', दै. हिंदुस्थान, अमरावती दि. २०–०६–१९९९)






# मेजवानी




वनराजाने एकदा
मेजवानी दिली
खाण्यासाठी प्राण्यांची
गर्दी खूप झाली



माकडाने शेंगदाण्याचे
बकाणे भरले
पोपटाने सगळे
पेरूच खाल्ले

हरणाने खाल्ले
हिरवे गवत साजरे
ससोबांना आवडली
लाल लाल गाजरे






हत्तीने खाल्ली
केळी दहा डझन
सिंहाला आली चक्कर
पाहून हे भोजन

होता उंदीर डॉक्टर
औषध त्यानं दिलं
आता नको मेजवानी
सिंहानं ठरवून टाकलं

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. ११–०१–१९९८)



## कटकट

चिमणीची चिव चिव
कावळ्याची काव काव
कुत्र्याचे केकाटणे
मांजरीची म्याव म्याव



ऐकून सारी ही कटकट
मला आला मोठ्ठा ताव
तारस्वरात ओरडलो
तुम सब चले जाव

☼☼☼

(पूर्वप्रसिद्धी – बालरंजन, 'रविवारीय साहित्य' पुरवणी,
दै. जनवाद, नागपूर, दि. १८–०१–१९९८)